# चला नाटक करू

उमा आनंद

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. २९३३
BVBK-0402933



बा.वा.
२०३३
31/3/98

नेहरू बाल पुस्तकालय

# चला नाटक करू

उमा आनंद
चित्रकार
मिकी पटेल
अनुवादक
सई परांजपे



BVBK-0402933

म. सं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा क्र. २०३३ दिनांक 31/3/98
विषय बा.वा. क्र...........

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

पहिली आवृत्ती 1971 (शके 1893)
दुसरे पुनर्मुद्रण 1992 (शके 1914)

© उमा आनंद, 1971

रु. 7.00

Let's Do A Play (*Marathi*)

प्रकाशक. संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क,
नवी दिल्ली-110 016



2033

# चला नाटक करू

दीपक उन्हात गवतावर लोळत कॉमिक वाचीत पडला होता. आज शाळेचा शेवटचा दिवस. नुकताच तो परत आला होता. आपल्या जुन्या कॉमिकवर त्याने रफीककडून नवे कोरे कॉमिक मिळवले होते. रफीक हा त्याचा दोस्त आणि शेजारी. आई 5 वाजता कामाहून येणार. त्या आधी कॉमिक वाचून संपवलं पाहिजे! कॉमिक वाचण्यात सुट्टी वाया दवडलेली आईला मुळीच आवडत नसे.

"पीऽऽ पीऽऽ पीऽ हाऽऽ पाऽऽ पीऽऽ" कुठूनतरी शिट्टीचा कर्कश आवाज ऐकू आला. दीपक खडबडून उठून बसला.

"पीऽऽ पीऽऽ पीऽ हाऽऽ पाऽऽ पीऽऽ" पुन्हा तोच विचित्र आवाज.



दीपकने टुणकन उडी मारली आणि तो जो धावत सुटला तो थेट फाटकाबाहेर. घरापुढून जाणाऱ्या अरुंद गल्लीच्या कोपऱ्याशी झुपकेदार मिशांचा, लुकलुकणाऱ्या डोळ्यांचा एक उंच काळगेला माणूस उभा होता. दीपककडे पाहून तो हसला. प्रचंड पिवळा सैलसर फेटा, पांढरे धोतर आणि लाल कुडता असा त्याचा वेष होता. दोन सोन्याच्या रिंगा त्याच्या कानात चगचमत होत्या. पाठीवर धोकटी होती. त्याच्याबरोबर एक तरुण मुलगा आणि एक पोऱ्या होता. त्यांनी त्याच्यासारखाच पोशाख केला होता. पोराचा फेटा हिरवा होता, एवढेच.

"पीऽऽ पीऽऽ पीऽ हाऽऽ पाऽ पीऽऽ" पुन्हा त्या माणसाने मजेशीर आवाज काढला. त्याच्या तोंडात कसलीतरी शिट्टी त्याने दडवली असणार खास.

दीपक एकदम परत फिरला आणि बागेतल्या कुंपणापाशी धावत गेला. त्याच्या आणि शेजारच्या घराच्या बागेच्या बरोबर मधोमध हे कुंपण होते.

"डीडो," त्याने उड्या मारीतच हाक मारली "लवकर बाहेर ये. अगदी लवकर."

"आलो, आलो." लगेच उत्तर आले, आणि पाठोपाठ एक काटकुळा उंचेला मुलगा बाहेर पडला. हा दीपकचा प्रिय मित्र रफीक. मित्रमंडळीत डीडो याच नावाने तो प्रसिद्ध होता.

"आले आले." आणखी एक किनरा आवाज ऐकू आला; आणि कुरळ्या केसांची गुबगुबीत गालांची एक सुरेखशी मुलगी धावत बाहेर आली.

"अरे देवा!" दीपक कुरकुरला. "या पारोला कुणी बोलावलं होतं?"

त्या छोट्या मुलीचं लगेच हसू मावळलं. ती मुलगी म्हणजे रफीकची बहीण परवीण. आपल्या भावाबद्दल तिला मोठा अभिमान वाटे. अवघी 10 वर्षांची असूनही; तो करील ती प्रत्येक गोष्ट आपण करावी, असे तिला वाटे. रफीक आणि दीपक दोघे 12 वर्षांहून थोडे मोठे होते. पारोची लुडबूड दीपकला मुळीच आवडत नसे. तिच्यामुळे साऱ्या रंगाचा बेरंग होई. "जाऊ दे रे" डीडो पोक्तपणे म्हणाला. "तिच्याकडे लक्ष नको देऊस. बोल! मला का हाक मारलीस?"



"अरे आपल्या गल्लीत बाहुल्यांचा नाच करणारा आला आहे. तो बहुतेक बाजारात आपला तळ ठोकणार. चल ना. आपणही गंमत पाहू या."

"मला पण न्या" पारो मुलांच्या पाठोपाठ गल्लीमध्ये घुसली.

"मला पऽऽण" आणखी एक आवाज आला. गोल गरगरीत असा एक मुलगा पाहता पाहता तिथे उगवला आणि पारोच्या पाठोपाठ धावू लागला.

"बघ काय घोटाळा करून ठेवलास तो!" दीपक ओरडला "आता या टप्पोची ब्याद बरोबर न्यावी लागणार."


"चला सारे मिळूनच जाऊ" डीडो म्हणाला "पारो, हात पकड." कुठलीही गोष्ट नेहमी गोड मानून घ्यायची हा डीडोचा स्वभाव होता.

"टप्पो, बस पाठुंगळी" हसून वेळ साजरी करीत दीपक म्हणाला, आणि धाकट्या भावाला त्याने पाठीवर घेतले.

लवकरच ती सगळी बाजारात पोचली. आधीच गर्दी जमली होती. "पी पीऽऽ हा पाऽऽ पीऽऽ" बाहुलीवाल्याची शिट्टी वाजली. पाठोपाठ पोऱ्याने ढोलकीवर बोल काढले "डम टा टा डम."

गर्दीतून वाट रेटीत पोरे पार पुढे पोचली. जागा पटकावून ती बाकीच्यांबरोबर खेळ पाहयला बसली. बाहुलीवाल्याने आपला खोकड्याचा रंगमंच मांडला होता. मागच्या बाजूने, तो बोटे नाचवून बाहुल्यांचा खेळ करीत होता. बोटांभोवती लांब लांब दोऱ्या त्याने गुंडाळल्या होत्या.


स्टेजवर दरबाराचा देखावा मांडला होता. राणा अमरसिंग राठोड आपल्या राणीसह—हाडी राणीसह—सज्ज्यात बसला होता काय सुरेख पोशाख होता या लाकडी बाहुल्यांचा. राणाच्या झुपकेदार मिशा थेट बाहुलीवाल्यासारख्या दिसत होत्या. त्याच्या कानात सोनेरी रिंगा आणि डोक्यावर मुकुट शोभत होता. लाल आणि चंदेरी कपड्यांमध्ये राणी फारच सुंदर दिसत होती. गळ्यात हिरेमाणके लखलखत होती. सज्ज्याच्या खाली एक दरबारी नर्तकी नाच करीत होती. बाहुलीवाला तिला विलक्षण कौशल्याने नाचवीत



होता. गिरक्यांवर गिरक्या. नर्तकीचा घागरा भिंगरीसारखा गोल गोल भिरभिरत होता.

"पीऽ पीऽऽ हा पाऽ पीऽऽ" शिट्टी कर्कशपणे वाजली. "डम टा टा डम" ढोल बोलला, आणि क्षणात त्या ठिकाणी एक गारुडी अवतरला. त्याने पुंगी वाजवताच त्याच्या टोपलीमधून एक साप वळवळत बाहेर पडला. एक काळा पांढरा कुत्रा कोलांट्या उड्या मारू लागला. तोच अचानकपणे एक निरोप्या बाहुला घाबऱ्या घाबऱ्या धावत आला. शत्रू चालून येत होता! अमरसिंग राठोड उटला. त्याने तलवार सरसावली, घोड्यावर टांग मारली, आणि पाहता पाहता तो दिसेनासा झाला.

मग देखावा बदलला. आता रणांगण दिसत होते. काळ्या घोड्यावर स्वार झालेला अमरसिंग, लाल घोड्यावर आरूढ झालेल्या शत्रूशी दोन हात करीत होता. घोडे एकमेकांशी टक्कर घेत होते. तलवारी खणखणत होत्या. "डम टा टा डम. डम टा टा डम;" ढोल दुमदुमत होता. "पीऽ पीऽऽ हाऽ पाऽऽ पी" शिट्टी किंचाळत होती. अमरसिंग जिंकला. लाल घोड्यावरचा राजा खाली कोसळला; आणि निपचित पडून राहिला.



प्रेक्षकांनी टाळ्या पिटल्या. हिरवा फेटेवाला छोकरा उठला, आणि आपले मडके पुढे धरून तो हिंडू लागला. लोकांनी मडक्यात चवल्या, पावल्या टाकल्या.

"अरे देवा." दीपक चुकचुकला" माझ्याकडे तर पैसेच नाहीत. डीडो तुझ्याकडे आहे का रे काही ?"

रफीकने नकारार्थी मान हलविली.

"माझ्याकडे आहेत पैसे" पारो उत्साहाने ओरडली आणि तिने 25 नव्या पैशांचे नाणे खिशातून काढले.

"शाबास." दीपक म्हणाला, "दे त्याला." मुली कधीमधी उपयोगी पडू शकतात त्या अशा!

पारोने मडक्यात नाणे टाकले. गर्दी पांगू लागताच मुलेही तिथून निघाली.

"दीपक, जरा लवकरच जायला हवं" डीडो म्हणाला, "घरी काळजी करीत असणार."

चारी मुलं बोळातून धावू लागली.



"काय रे, आपण आपला खेळ का करू नये?" धापा टाकीत दीपकने सवाल केला.

"हो! पण आपल्याला बाहुल्या कुठून मिळणार " डीडोने उलट प्रश्न केला.

"अरे वेड्या, आपल्याला बाहुल्यांची गरजच काय ?" दीपक म्हणाला.

"आपणच कामं करायची. मी होईन अमरसिंग राठोड" आणि असं म्हणून त्याने आवेशाने आपला हात फिरवला. जणू काही त्याच्या हातात तलवारच होती. "अर्थात तुला त्याचं काम करायचं नसेल तरच हं!"

"छे छे" डीडो घाईघाईने म्हणाला." मला तो हरणारा राजा व्हायलाच जास्त आवडेल. मरायचा तो सीन करायला काय गंमत येईल!" आणि असं म्हणून त्याने हात बाजूला फेकले, डोळे गरागरा फिरवले, आणि जमिनीवर अशी काही लोळण घेतली की बाकीच्या मुलांना हसूच कोसळले.

"मी पऽऽण" गुबदुल टप्पो ओरडला, आणि त्याने सरळ डीडोच्या अंगावर उडी घारली.

"ए डीडो ऊठ, ऊठ" पारोने हुकूम सोडला. डीडोच्या अंगावर कोसळलेल्या टप्पोला दीपकने उचलून बाजूला केले.

"ए दीपक, तुझ्या घराबाहेर बघ टॅक्सी उभी आहे, तुझी आई पण तुला हाका मारते आहे."

"दीपक, अरे होतास तरी कुठे?" दीपकची आई फाटकात येऊन काळजीयुक्त आवाजात विचारू लागली. "छान! टप्पो तुमच्या बरोबरच आहे वाटतं? चावट कुठचा! अरे तुम्ही घरी नव्हता म्हणून केवढी घाबरले मी. आज संध्याकाळी मुंबईहून प्रेममामा यायचा होता हे विसरलात वाटतं? तो आला तर घरी कुणीच नाही!"

"चुकलो मा, मी खरंच विसरलो!" दीपकने कबुलीजबाब दिला. "आम्ही की नाही, बाहुल्यांचा खेळ पाहायला गेलो होतो."

एवढ्यात टॅक्सीमधून एक उंच माणूस उतरला. पुढे येऊन तो दीपकला कडकडून भेटला. हेच प्रेममामा.

"काही बिघडलं नाही बरं" प्रेममामा म्हणाले "बाहुलीवाला म्हणजे जादूगार खरा! तुमच्यावर मोहिनी घातली बरं का त्यानं. बरं, ही तुमची बहीण अनू"

टॅक्सीमधून एक सोळा वर्षांची मुलगी उतरली.

"अनुताई नमस्ते" दीपक लाजत बिचकत म्हणाला. "मला नाही तू आठवत.'

"अरे पण मला तू आठवतोस ना!" अनू हसत उत्तरली.

"मी पण. मी पण—" टप्पो ओरडला.

"हो तर. गुंडोबा, तूं तर सगळयांत आधी" आणि असं म्हणून अनूने टप्पोला कडेवर उचलले.

"मुलांनो, सामान आत आणा बघू" आईने बजावलं "डीडोच्या आईनं आपल्या सगळयांना फराळाला बोलावलं आहे".

"अहो. मस्त. झक्क! फर्मास!!" पोरे एका स्वरांत ओरडली, आणि भराभरा सामान उचलून आत नेऊ लागली.



# पडदा वर

शेजारच्यांच्या दिवाणखान्यात सगळ्यांनी टेबलाभोवती दाटी केली. हसऱ्या चेहऱ्याच्या, गोल गरगरीत अन्वरकाकू मोठ्यांना चहा आणि मुलांना दूध ओतून देत होत्या. अन्वरकाकू थेट आपल्या लेकीची, परवीणचीच मोठी आवृत्ति जणू! टेबलावर गरमगरम भजी आणि ताज्याताज्या जिलब्या आल्या आणि सगळे त्यांच्यावर तुटून पडले. तोंडांनी गप्पा चालूच होत्या.

आपला एकुलता एक मामा भेटल्यामुळे दीपक विलक्षण खुषीत होता. अखिल भारतीय नाट्यस्पर्धेत भाग घ्यायलां म्हणून प्रेममामा मुद्दाम मुंबईहून आले होते. त्यांच्या नाट्यसंस्थेचं नाव होतं हिंदमंच. त्यांच्याबरोबर एकूण 20 लोक आले होते. बाकीच्या नाट्यसंस्थांप्रमाणे ते सगळे लोक वसतिगृहांमधून उतरले होते. पण गावात खुद्द बहीण असल्यामुळे प्रेममामा मात्र दीपककडे उतरले होते. अर्थात अनूदेखील. अनूने नुकतीच हायर सेकंडरीची परीक्षा दिली होती. निकाल लागायला चिक्कार अवकाश होता. तोपर्यंत सुट्टीच सुट्टी. मग सावकाश कॉलेज, हिंदमंचतर्फे होणाऱ्या एका नाटकात तीपण काम करीत होती.

"प्रेममामा, तुम्ही कोणती कोणती नाटकं करणार?" दीपकने विचारलं.

"आम्ही दोन नाटकं घेऊन आलोय." मामा म्हणाले. "एक आहे तुघलक. एका भारतीय माणसाने लिहिलं आहे ते. फार मोठा राजा होऊन गेला तुघलक.

"म्हणजे वेडा महमद तर नाही?" डीडोने प्रश्न केला. डीडोला इतिहासाची विलक्षण आवड होती.



"होय तोच. महमद तुघलकला बरेच वेळा वेडा महमद म्हणत. विलक्षण बुद्धिमान होता तुघलक. हा हुशार राजा आयुष्याच्या अखेरीस एक माथेफिरू सत्ताधारी कसा बनला, हे या नाटकात दाखवलं आहे."

"दुसरं कोणतं नाटक?" दीपकने विचारलं.

"दुसरं नाटक मीच लिहिलं आहे." मामा म्हणाले. सद्यपरिस्थितीवर प्रकाश टाकणारं विनोदी आहे बरं का!"

"खरंच इतकं गंमतीशीर आहे नाटक"—अनू हसत म्हणाली.

"आणि त्यात अनूताई खूप हसवतात बरं का." मामा कौतुकाने म्हणाले.

"अनू तू नाटकात काम करते आहेस?" दीपकच्या पोटात जरासे खुटखुटले.

"हो तर." प्रेममामा म्हणाले." आणि छान करते आहे बरं का!"

"मला पण नाटकात काम करायचं आहे." दीपकने जाहीर केलं." मामा, हिंदमंचमधे मला घ्या ना."

"सबूर सबूर बेटा. अजून शाळा संपवायची आहे म्हटलं. अनू काय, लवकरच कॉलेजात जाईल. पुढे तिला काय व्हायचं आहे—शिक्षिका, पत्रकार, नटी का आणखी काही, हे ठरवायला खूप अवकाश आहे. पण काय रे, बाबांसारखं तुला वैमानिक नाही का व्हायचं?"

"छे छे!" अन्वरकाकू झटकन बोलून गेल्या. त्यांनी दीपकच्या आईकडे चोरटा कटाक्ष टाकला. दीपकच्या आईचा चेहरा पार पडला होता. क्षणभर चमत्कारिक शांतता पसरली. दीपकचे वडील फ्लाइंग ऑफिसर अर्जुनदास. हे भारतीय हवाई दलामधले एक धाडसी वैमानिक होते. काही वर्षांपूर्वी देशाचे संरक्षण करताना त्यांनी देह ठेवला होता. तेव्हापासून दासमावशींनी एका मुलींच्या कॉलेजात नोकरी धरली होती. त्या कामाला गेल्या म्हणजे अन्वर मंडळी छोट्या टप्पोला संभाळीत. त्यांना जर कधी उशीर होणार असला की अन्वरकाकू दोन्ही मुलांना आपल्याकडेच आणीत.

"मला आधी वैमानिक व्हायचं होतं" शांततेचा भंग करीत दीपक म्हणाला "पण आता मला नट व्हायचं आहे. मघाशीच नाटकाबद्दल आमचे बेत चालले होते. बाहुल्यांचं नाटक पाहिलं आम्ही. मला तर त्यातल्यासारखं अमरसिंग राठोड व्हायचं आहे."

"आणि मला जखमी शिपाई बनायचं आहे." डीडो ओरडला आणि खुर्चीतल्या खुर्चीत तो धपकन् कलंडला. सगळ्यांना त्याचा अभिनय पाहून हसू लोटले.

"मी ऽ पन. मी ऽऽ पन." टप्पोने पुकारलं. डीडोची नक्कल करायला तो गेला, तो खुर्चीतून धप्पदिशी खालीच पडला.

"चात्रट आहे पक्का!" दासमावशींनी शेरा मारला, आणि अनूने जखमी शिपायाला उचलून कडेवर घेतला.

"मामा, आम्हाला नाटक बसवायला मदत कराल ना?" दीपकने विचारले.

"अवश्य" मामा म्हणाले. "पण आधी आता मला जरा माझ्या नाटकाकडे लक्ष पुरवलं पाहिजे. चला अनूताई, उशीर झाला. थिएटरवर गेलं पाहिजे आपल्याला."

"एवढ्यांत? आताच तर आलात तुम्ही मंडळी" दासमावशी म्हणाल्या.

"ते खरं ग." मामा दिलगिरीच्या सुरात बोलले. "पण हे काही तुला नवीन नाही. मी माझ्या रंगमंचव्यवस्थापकाला भेटायचं कबूल केलं आहे तिथे."

"आम्ही येऊ?" डीडोने विचारलं.

"हो हो जरूर."

"मी पन, मी पन" टप्पोने सूर उचलला.

"नाही नाही—" टप्पोच्या आईने विरोध केला, पण लागलीच अनूने रदबदली केली.

"येऊ दे न मावशी. मी संभाळीन टप्पोला."

"फार वेळ नाही लागणार आम्हाला" मामांनी पुस्ती जोडली. "मला फक्त स्टेजची आणि प्रकाशव्यवस्थेची थोडी कल्पना आली म्हणजे झालं."

"चला मी तुम्हाला थिएटरवर सोडतो." अन्वरकाका म्हणाले. अन्वरकाका अतिशय अबोल होते. आतापर्यंत ते एक शब्दही बोलले नव्हते. "मला त्याच बाजूला काम आहे. तासाभरात मी तुम्हाला परत घ्यायला येईन."

सेंट्रल थिएटरवर अन्वरकाकांनी त्यांना सोडले आणि ते निघून गेले. प्रेममामांना पाहताच एक लट्ठसा माणूस धावत आला. त्याने प्रेममामांशी हस्तांदोलन केलं. "छान झालं हं आलात ते" तो म्हणाला. "तुमचे स्टेजमॅनेजर श्री. काटकर तुमची वाट पाहताहेत." मंडळींना घेऊन तो थिएटरच्या समोरच्या मोकळ्या दालनात शिरला. दोन प्रशस्त दारे सताड उघडी होती. त्यातून सगळे आत गेले.

आत हॉलमध्ये अगदी अंधुक उजेड होता. रिकाम्या खुर्च्यांच्या रांगाच रांगा होत्या. अगदी दुसऱ्या टोकाला जाड काळपट पडद्याने झाकलेले स्टेज होते.

"पडदा वर!" प्रेममामा एकदम ओरडले.

घरघरघर आवाज वातावरणात भरून गेला. जड मखमली पडदा हळूहळू विभागला आणि वर गेला.

दीपकने श्वास रोखून धरला. मोकळा रंगमंच त्याच्यासमोर पसरला होता. तो पळत पुढे गेला आणि कोपऱ्यातल्या पायऱ्या चढून थेट स्टेजवरच जाऊन पोचला.

"स्टेजवरचे दिवे लावा." प्रेममामा ओरडला.

निमिषार्धात रंगमंच प्रखर प्रकाशाने उजळून गेला. मधोमध एक लहान आकृती उभी होती—दीपक! अंधाऱ्या हॉलकडे मिचमिचत्या डोळ्यांनी त्याने पाहिले.

"वाहवा! शाब्बास." डीडो टाळ्या वाजवीत ओरडला. दीपकने कमरेत वाकून मुजरा केला. सगळी मुले हसली आणि त्यांनी टाळ्या पिटल्या.

"मी ऽऽ पण" टप्पो ओरडला.

"चला तर पोरांनो. या वर." प्रेममामा म्हणाले "आपणही स्टेजवरच्या हीरोला जाऊन गाठू या."

## नटाचे घर

रंगमंचावर एकटाच उभा असताना, अंगावर जेव्हा प्रकाशाचा प्रखर झोत आला, तेव्हा क्षणभरच का होईना, पण दीपकला अद्‌भुत आनंदाचा आणि सामर्थ्याचा साक्षात्कार झाला. समोर विस्तीर्ण काळोखा हॉल पसरला होता. "वाहवा, शाबास!" असं डीडो ओरडला आणि त्या अद्‌भुत अनुभवाचा लोप झाला. दीपकने कमरेत वाकून मुजरा केला. त्याच क्षणी त्याने स्वतःशी एक निश्चय केला. अशाच प्रख प्रकाशझोतात उभा राहून एक दिवशी खरोखरच तो रंगमंचावरून खऱ्याखुऱ्या प्रेक्षकांना खरेखुरे अभिवादन करणार........


पाहता पाहता सगळेच स्टेजवर जमले.

प्रेममामा म्हणाले, "रंगमंच आणि मंचाच्या मागची बाजू—बॅकस्टेज—हेच नटाचे घर! नटाला सगळ्यात अधिक आनंद केव्हा होतो, तर स्टेजवर. प्रेक्षकांच्या टाळ्यांचा कडकडाट हेच त्याचे खरे बक्षीस. त्याला याहून अधिक काही नको असतं."

दीपकचेही नेमके हेच मत होते. सगळ्याच नटांना असे वाटते हे ऐकून त्याला नवल वाटले.

"तो क्षण मिळवायला मात्र फार मोठी मेहनत करावी लागते हं. एकजूट आणि संघबळ यावरच प्रयोगाची सारी मदार असते. चला, आधी तुम्हाला स्टेजची माहिती करून देतो. हे पाहिलंत, स्टेज तीन भागात विभागतात. मंचमध्य, उत्तरमंच आणि दक्षिणमंच. किंवा इंग्रजीत सांगायचं म्हणजे सेंटर, अपस्टेज आणि डाऊनस्टेज. परत या तीन भागांचे तीन तीन विभाग होतात. मध्य, डावा, आणि उजवा. या

### सायक्लोरामा किंवा 'गगनिका'



सगळ्या दिशा नटाच्या दृष्टिकोणातून ठरविलेल्या असतात. चला मी तुम्हाला प्रत्यक्षच करून दाखवितो. दीपक, चल ये इकडे."

"मी ऽऽ पण" अनूच्या कडेवर असलेल्या टप्पोने पुकारले.

"बरं तर प्रथम टप्पो. अनू, त्याला सेंटर स्टेजवर ठेव बरं."

अनूने टप्पोला मंचाच्या बरोबर मध्यावर ठेवले. तिथे तो ऐटीत उभा राहिला

"दीपक आता तू सेंटर राइटला उभा राहा. म्हणजेच टप्पोच्या उजव्या हाताला. प्रेक्षकांकडे तोंड करून. डीडो तू सेंटर लेफ्ट."

दोन्ही मुलगे आपापल्या जागेवर उभे राहिले.

"मुलांनो, आता तुम्ही डाऊन लेफ्ट आणि डाऊन राइटला जा पाहू."

"म्हणजे कुठे बुवा!" डीडोला प्रश्न पडला.

"अरे प्रेक्षकांच्या दिशेला."

मुले पुढे सरकली. दीपक डाऊन राइट आणि डीडो डाऊन लेफ्ट.

"पारो, तू कुठे आहेस?" प्रेममामांनी हाक मारली.

"इथे." एक फुरंगटलेला आवाज आला. इतका वेळ तिला काहीच न सांगितल्यामुळे पारो जरा रुसली होती.

"थेट वरती जा आणि टप्पोच्या मागे उभी राहा....अजून मागे. अजून मागे. जितक्या मागे जाणं शक्य असेल तितक्या मागे जा."

पारो स्टेजच्या अगदी मागे धावत गेली आणि मधोमध उभी राहिली. "... भिंत आहे. याच्यापेक्षा मागे नाही जाता येणार." स्टेजच्या मा...च्या बाज... स्वतंत्र गोलाकार झालेली एक भिंत आडवी पसरली होती.

...च्या

"ही 'भिंत' म्हणजे सायक्लोरामा बरं का. किंवा गगन...

"हिच्यावर प्रकाश टाकून फार सुंदर रंगीबेरंगी दे...

निर्माण करता येतात. डीडो, आता तू स्टे... ...का." प्रेममामांनी सांगितले

...आवे बनवता येतात. सावल्यादेखील

डीडो बुचकळ्यात पडला. अ... ...ओलांडून अप स्टेज राइटला जा."

...ून त्याला मानेनेच इशारा करून जागा दाखवली

डाऊन लेफ्टकडून तिरपा धावत जाऊन डीडो दीपकच्या मागे, पार मागच्या कोपऱ्यात उभा राहिला.

"दीपक, तू अप लेफ्ट जा."

दीपक धावत जाऊन पारोच्या डाव्या बाजूला उभा राहिला.

"आपल्या नटांना दिग्दर्शक अशा सूचना देतो बरं का. प्रकाशयोजक किंवा लाइटमॅन असतो, त्याला देखील अशाच सूचना दिल्या जातात. कोणताच अभिनेता मनाला येईल त्याप्रमाणे इकडेतिकडे हिंडू शकत नाही. जेव्हा आवश्यक असेल, तेव्हाच तो जागचा हालतो.

"हाणामारीचा सीन असेल तर?" दीपकने अडचण विचारली. अजून त्याच्या डोक्यात अमरसिंग राठोडच होता. त्याची भूमिका करणार होता तो.

"लढाईच्या प्रवेशातसुद्धा प्रत्येक गोष्ट आधी ठरलेली असते. जर प्रत्येक नटाने आपल्या डोक्यात येईल तसे करायचे ठरवले, तर असा काही गोंधळ उडेल, की स्टेजवर काय चाललं आहे याचा प्रेक्षकांना पत्ताच लागणार नाही. एकमेकांसमोर आपण उभे राहात नाही, याबद्दल प्रत्येक नटाला दक्ष असावे लागते. याला आम्ही 'कव्हर' करणे म्हणतो. दुसरा नट काही महत्त्वाचे भाषण बोलत असला, किंवा अभिनय करीत असला, की बाकीच्यांनी स्तब्ध राहिले पाहिजे. म्हणजे प्रेक्षकांचे लक्ष विभागले नाही. थोडक्यात काय आहे दीपक, की प्रत्येक नटाला शिस्त आणि संघनीती लागते. पण चला, आता बाकीचा 'पार्श्वमंच' तुम्हाला दाखवतो."

...जच्या पार डाव्या बाजूला घेऊन गेले. तिथे मोठाले लाकडी

दोन्हीकडे विंग्स असतात. हा भाग स्टेजवरच
...वेश करण्याआधी नटमंडळी इथे उभी
...गणारे सामान मांडून ठेवतो तो
...ी छत्री, लॉग...."

"किंवा तलवार!" डीडो मध्येच म्हणाला.

"किंवा तलवार!" मामा म्हणाले. "एखाद्या प्रवेशात नटाला लागणार असेल तर."

"ते काय आहे?" पारोने एका मोठ्या लाकडी बोर्डाकडे बोट दाखवले. तऱ्हतऱ्हेची विजेची बटणं, तारा आणि मोठाल्या हँडल्सनी बोर्ड भरून गेला होता. त्याच्यापुढे एक उंच स्टूल मांडले होते.

"हा लाइट आणि डिमर बोर्ड" मामांनी सांगितले. "प्रत्येक बटणावर, ते कोणत्या दिव्याचे बटण आहे याचा नंबर घातला आहे."

"आणि ही हँडल्स कशासाठी?" दीपकची शंका.

"या हँडल्सना डिमर्स म्हणतात." मामांनी उत्तर दिले.

"हँडल वर किंवा खाली करून दिव्यांची ओळच्या ओळ कमी किंवा जास्त प्रखर करता येते. प्रकाश कमी जास्त करता येतो. स्टेजच्या मागे येऊन जरा वर पाहा बघू."

सगळी मुले मागे गेली, आणि त्यांनी वर पाहिले. टप्पोतर इतका मागे वाकला की त्याचा तोल जाऊन तो धप्पदिशी खालीच पडला. त्याला अनूने वर उचलले.

स्टेजच्या वरचे छत इतके उंच होते की ते जवळ जवळ दिसतच नव्हते. वर चमचमणाऱ्या दिव्यांच्या रांगाच रांगा होत्या. दीपक आश्चर्यचकित झाला. आयुष्यात कधी इतके बल्ब त्याने पाहिले नव्हते!


"दिव्यांच्या प्रत्येक ओळीला बॅटन म्हणतात, प्रत्येक बॅटनसाठी अवघा एक स्विच असतो."


"ते मोठाले काळे दिवे कसले?" डीडोने मोठाले बल्ब असलेल्या स्वतंत्र दिव्यांकडे बोट दाखवून विचारले.

"त्यांना स्पॉटलाइट म्हणतात. अतिशय प्रखर असतात ते. पण रंगभूमीच्या थोड्याशाच जागेवर त्यांचा प्रकाश पडू शकतो."

"बॅटन्स आणि स्पॉटलाइट्स एकत्र कमीजास्त करता येतात?"

"हो तर. चला तुम्हाला दाखवतोच."




DANGER
440VOLTS

प्रेममामा बटणांच्या बोर्डकडे—स्विचबोर्डकडे गेले. "प्रथम मी मध्यवर्ती बॅटन मंद करतो", असं म्हणून मामांनी एक हँडल हळूहळू फिरवले. दिव्यांची एक संपूर्ण रांग मंदावत मंदावत शेवटी संपूर्णपणे मालवली गेली. "आता स्पॉट पाहा." मोठा दिवा झळकू लागला. प्रेममामांनी दुसरे हँडल फिरवताच, तोही कमी होत होत, विझून गेला.

"काटकर." प्रेममामांनी एकदम मोठ्याने हाक मारली. "लाल पडदा खाली सोडू शकाल का?"

"हो." दोऱ्या आणि तुळयांनी गजबजलेल्या छतामधून उत्तर आले. पाहता पाहता एक लाल पडदा कुईंकुईं आवाज करीत सावकाश खाली आला, तो रंगमंचाच्या थेट मध्यभागी. स्टेजचा मागचा भाग दृष्टिआड झाला. पडदा दोन लांब दोऱ्यांनी एका बांबूला बांधलेला होता.

"या लाल पडद्याच्या पुढे आता तुम्ही खुशाल प्रवेश करू शकता." प्रेममामा म्हणाले. तोपर्यंत मदतनीस मंडळी दुसऱ्या प्रवेशाची मागे तयारी करून ठेवतील. पडदा-उचला!

पुन्हा लाल पडदा वर सरकू लागला.

"मी ऽऽ पण" टप्पो ओरडू लागला. अनूच्या हातातून निसटून पडदा पकडण्याचा प्रयत्न तो करू लागला."

"तुम्ही नको मिस्टर!" अनू लटक्या रागाने म्हणाली.

"नटांना असं वर खाली उचलता येतं का?" दीपकने विचारलं.


"हो तर. एका लोखंडी तुळईवर झोके घेऊन नंतर स्टेजवर उडी ठोकणारा बहाद्दर मीच पाहिला आहे."

"ओहो, मज्जा!" डीडोने टाळ्या वाजवल्या. आपल्याला आवडेल बुवा असं करायला.

"स्टेजच्या जमिनीला एक चोर दरवाजा आहे. फळी उघडली की तळघरात जाण्यासाठी पायऱ्या आहेत पाहा. थेट स्टेजच्या खालीच."

"वा! पळून जायचा प्रसंग करण्यासाठी काय नामी कल्पना आहे."

"चला आता ग्रीनरूममधे जाऊ."



विंग्समधून एका बोळात मंडळी शिरली. तिथे शेजारी शेजारी तीन खोल्या होत्या. एका खोलीत कपाटेच कपाटे आणि खोकी होती. इथे नाटकाचा पोशाख ठेवण्याची आणि कपड्यांना इस्त्री करण्याची व्यवस्था केलेली होती. दुसऱ्या दोन खोल्यांमधून ड्रेसिंग टेबले ओळींनी लावलेली होती. या टेबलांना प्रचंड आरसे होते.

"पण या खोल्या हिरव्या कुठे आहेत?" खोलींच्या पांढऱ्या भिंती न्याहाळत पारोने शंका विचारली.


"अग वेडे ग्रीनरूम म्हणजे रंगपट. कपडे बदलायची, तयार होण्याची खोली. एक पुरुषांसाठी, एक बायकांसाठी."

एवढ्यात दूर मोटारचा पोंगा वाजला.

"आपली गाडी आली." डीडो म्हणाला.

"चलो सब लोग" मामा म्हणाले. "आज तुम्ही नटाचं घर पाहिलंत. आता आपआपल्या घरी पळा. उद्या आपण नाटकाची तालीम पाहू."

घरी जाण्यासाठी मोटरमध्ये चढता चढता दीपकने निश्चय केला, की एके दिवशी हे नटाचे घर, त्याचे स्वतःचे घर होणार!



## सुरुवात सुरुवातीपासून

दूसऱ्या दिवशी थिएटरच्या वाटेवर पारोने विचारलं" मामा, नाटक कसं करतात?"

"किती वेडपटपणाचा प्रश्न आहे" दीपकने टर उडवली. पण मामा म्हणाले, "अगदी उत्तम प्रश्न विचारला पारोनं. हे बघ पारो, आपण सुरुवातीपासूनच सुरुवात करू. सगळ्यांत आधी नाटकाचे वेड असणारी काही मंडळी एकत्र करावी लागतात. म्हणजे फक्त नाटकात अभिनय करणारी नव्हे, तर वेशभूषा, रंगमंचव्यवस्था, रंगभूषा प्रकाश, ध्वनी—या सगळ्या जबाबदाऱ्या आवडीने उचलणारी. त्यानंतर एखादं चांगलं नाटक मिळवायचं."

"किंवा स्वतःच लिहायचं" डीडो म्हणाला.

"किंवा स्वतःच लिहायचं! पण ते कठीण असतं, आणि त्याला वेळही फार लागतो. नाटकाची निवड अतिशय महत्त्वाची असते. तुम्ही शोकपूर्ण नाटक निवडा...."

"म्हणजे शोकांतिका, ट्रॅजडी. हो ना?" दीपकने मध्येच तोंड घातले.

"हो. किंवा विनोदी नाटक निवडा."

"म्हणजे कॉमिक?" पारोचा प्रश्न.

"कॉमिक नाही वेडे कॉमेडी" दीपकने चूक दुरुस्त केली. "हो की नाही हो मामा?"

"बरोबर. तुम्ही जे नाटक निवडाल, मग ते विनोदी असो वा गंभीर असो; पुरातन काळातले असो वा अगदी चालू परिस्थितीवरचे असो; ते प्रेक्षकांच्या

जिव्हाळ्याचे असले पाहिजे. नाहीतर ते प्रयोग पाहायला येणार नाहीत. त्यानंतर सगळ्या भूमिका करायला नटनटी आहेत की नाही, हे पाहिलं पाहिजे."

"म्हणजे पात्रं जमवली पाहिजेत." अनूने पुस्ती जोडली.

"मग संच एकत्र करून दिग्दर्शक निवडला पाहिजे. त्यानंतर नाट्यवाचन. बरीचशी नाटके वाचून मग निर्णय पक्का करता येतो. आपल्याला आवडतील त्या भूमिका नटांनी आलटून पालटून वाचून पहाव्यात. अर्थात अखेरचा निर्णय दिग्दर्शकाचा."

"नायक किंवा नायिकेपेक्षा दिग्दर्शक महत्त्वाचा असतो?" दीपकला प्रश्न पडला.

"हे पाहा सगळेच एक संघ म्हणून काम करतात. सगळेच महत्त्वाचे. दिग्दर्शक संघाचा नायक असतो एवढंच. पात्रांनी स्टेजवर कशा हालचाली करायच्या ते तो ठरवतो. तसंच त्यांना आपापल्या भूमिका उत्तम वठवायला मदत करतो."

आपणही दिग्दर्शकच व्हावे की काय, असा प्रश्न दीपकच्या डोक्यात घोळू लागला. "दिग्दर्शकाला नाटकातदेखील काम करता येतं?" त्यानं विचारलं.

"करायला लागलेच तर. पण त्याने स्वतः भूमिका न करणेच इष्ट. कितीतरी गोष्टी त्याला करायच्या असतात. इतरांना मार्गदर्शन करायचे, प्रकाश आणि ध्वनि-योजना ठाकठीक आहे की नाही हे पाहायचे, पोशाख नीट आहेत की नाही. सेट्स व्यवस्थित आहेत की नाही यावर लक्ष ठेवायचे, एक ना दोन, अशा हजार भानगडी असतात.

दीपकने सुस्कारा सोडला. संघनायक होण्याचा मान खराच, पण नाटकात काम न करणाऱ्या नायकाला कितपत गंमत येत असेल?

"दिग्दर्शकानंतर कोण महत्त्वाचा?" त्याने सवाल केला.

"रंगमंच व्यवस्थापक. म्हणजेच स्टेजमॅनेजर." मामांचे अनपेक्षित उत्तर आले.

"तालमी ठरविणे, नटमंडळी नक्की पाठ करताहेत की नाही यावर देखरेख ठेवणे, पोशाख आणि सेट्स तयार आहेत की नाही हे पाहणे, थिएटर भाड्याने घेणे, तिकीट-

विक्रीची व्यवस्था करणे—असंख्य कामे स्टेजमॅनेजर करतो. संघाचा तो खराखुरा व्यवस्थापकच म्हणा ना. अतिशय निःस्वार्थी असतो हं हा प्राणी. स्वतः स्टेजवर कधीच येत नाही; त्यामुळे तो किती महत्त्वाचा इसम आहे याची फारशी कुणाला कल्पनाच येत नाही."

काही झालं तरी आपण स्टेजमॅनेजर तर नक्कीच व्हायचं नाही, दीपकने मनाशीच ठरवलं.

"पण मग नाटक बसवतात कसं ?" पारोने पुन्हा प्रश्न केला.

"एकदा पात्रयोजना ठरली की तालमी सुरू होतात. जर नाटक मोठे असेल तर एका वेळेला काही प्रवेशच करता येतात. बहुतेक नाटकांचे तीन भाग किंवा अंक असतात. एका अंकात बरेचसे प्रवेश असू शकतात. नट जर हुषार आणि मेहनती असतील; तर लवकर लवकर नकला पाठ होतात. नंतर दिग्दर्शकाने सांगितलेल्या मूव्हस, म्हणजेच कोणत्या वेळेला कुठून कुठे जायचं ते अंगवळणी पाडण्याचा कार्यक्रम सुरू होतो. अवघड प्रवेशांच्या पुन्हा पुन्हा तालमी केल्या जातात. नटाच्या अंगात खूप सहनशक्ती असावी लागते. स्वतःची भूमिका वठवण्यासाठी आणि इतरांना त्यांच्या अभिनयात मदत करण्यासाठी.

नट होणं हे वाटलं होतं तितकं सोप नसल्याचं दीपकला उमजू लागलं होतं.

"सर्वांत महत्त्वाचा नट कोण ?" त्याने विचारले.

"चांगल्या टीममध्ये, हा कमी महत्त्वाचा, हा जास्त महत्त्वाचा असा भेद नसतोच मुळी. जरी काही भूमिका अधिक मोठ्या आणि अवघड असल्या, तरी रंगभूमीवर येणारी प्रत्येक व्यक्ती सारख्याच महत्त्वाची. ज्याच्या अंगात जास्त कलागुण असतील त्याला अधिक चांगल्या भूमिका मिळतात. पण साध्या निरोप्याचं काम करणारा, किंवा बाजारातल्या गर्दीत उभा असलेला नटसुद्धा नाटकाचा बोजवारा उडवू शकतो. त्याच्या कामाकडेही लक्ष पुरवणे आवश्यक असतं. आणि बरं का दीपक "प्रेममामा हसून म्हणाले" दुय्यम भूमिका करणाऱ्यांकडे लक्ष पुरवणारे ते खरे हाडाचे नट.

हिंदमंचमध्ये आम्ही एकाच माणसाला सगळयाच नाटकांमधून चांगल्या भूमिका कधीच देत नाही. एकच नट एका नाटकात नायक असू शकतो, दुसऱ्या नाटकात तो एखादा जख्ख म्हातारा असतो तर तिसऱ्या नाटकात तो फक्त गर्दीमधला असू शकतो. दीपक विलक्षण ओशाळला. "मला प्रत्येक खेपेलाच मुख्य काम करायचं आहे असं नाही माझं म्हणणं." तो म्हणाला. सगळेजण हसले.

"पण नाटक बसवतात कसं?" पुन्हा पारोने विचारलं. निम्मंअधिक बोलणं मुळी तिला कळतच नव्हतं.

"हे पाहा, एकदा सगळे प्रवेश घोटून तयार झाले की संपूर्ण नाटकाची बरेच वेळा तालीम होते. पोशाख आणि सेट्स तयार असतील, तर तयार स्टेजवर नाटकाचे कपडे घालूनच नटांना वावरण्याची संधी मिळते. केवळ तालमीसाठीच थिएटर भाड्याने घेणं महागात पडतं. म्हणून स्टेजवर अशा दोन एक तालमीतच नाटक-मंडळींना भागवावं लागतं. अशा तालमीला रंगीत तालीम म्हणतात. आता आपण सगळे अनायसे थिएटरमधेच आहोत, तेव्हा तुम्हाला एक रंगीत तालीमच दाखवतो. अगदी चुपचाप बसायला लागेल हं, न कंटाळता. कधीकधी एकच प्रवेश, नटाला जमेपर्यंत पुन्हापुन्हा करावा लागतो. तसंच दिव्यांची चाचणी पण घ्यावी लागते."

"बरं झालं, आपण टप्पोला नाही आणलं ते" अनू हसत म्हणाली.

"नाहीतर प्रत्येक गोष्ट स्वतः करण्यासाठी त्याने हट्ट केला असता."

"हो ना. 'मीऽऽपन.' "डीडो किनऱ्या आवाजात टप्पोची नक्कल करीत म्हणाला" भलताच गमतीशीर प्राणी आहे बुवा!"

## रंगीत तालीम

थिएटरमधे शिरताच ठोकण्याचा प्रचंड आवाज मुलांना ऐकू आला. स्टेज उघडंच होतं. लोक वरखाली चढत होते. सुतार हातोड्या घेऊन ठोकाठोकी करीत होते, मदतनीस मंडळी सेट उभारीत होती, प्रकाशतज्ज्ञ दिवे तपासत होते, तर तंत्रज्ञ टेपरेकॉर्डरवर रेकॉर्ड केलेले निरनिराळे आवाज वाजवून पाहात होता.

"चौथ्या किंवा पाचव्या रांगेत मधोमध बसा" मामांनी मुलांना सांगितले. "मी स्वतः आता गडबडीत आहे, पण अनू तुम्हाला सगळं समजावून सांगील."

दीपक आणि डींडो अनूच्या दोही बाजूंना बसले. पारो आपल्या भावाजवळ बसली.

"ओ-के! सगळे स्टेजच्या बाहेर व्हा." मामा ओरडले. "काटकर, तयार?"

"तयार!" कुठूनतरी अज्ञातातून आवाज आला.

"दिवे बंद." मामांनी हुकूम सोडला.

सगळे स्टेजच्या बाहेर गेले. दिवे मालवले गेले. स्टेजपुढचा पडदा बंद झाला. सगळीकडे काळोख झाला आणि क्षणार्धात सारे चिडचिप झाले.

"सुरू करा. स्टार्ट!"

दुरून कुठूनतरी 'अज्ञान' म्हटल्याचा मंदध्वनी ऐकू आला. पडदा हळूहळू उघडला. स्टेज अंधारात होते; कमानींच्या आकृत्या काय त्या दिसत होत्या. अज्ञानचा आवाज जसजसा मोठा होऊ लागला, तसतसा स्टेजचा पार्श्वभाग निळ्या प्रकाशाने उजळू लागला. आता भिंती दिसू लागल्या, एक जिना आणि किल्ल्याचा





तटही दिसू लागला. प्रकाशाचे पिवळे झोत वातावरणात मिसळले, आणि मंच हळूहळू प्रकाशित झाला.

"पाहिलंत ना? पहाट झाल्याचा आभास केवळ दिव्यांमुळे निर्माण करता आला" अनू कुजबुजली." या अझानच्या घोषामुळेदेखील वेळ कळणे सोपे झाले. तसेच शहर मशिदींनी गजबजलेले असल्याचेही या अशा इफेक्टसमुळे चटकन् ध्यानात आले. कुठलं शहर आहे ठाऊक? दिल्ली!"

"काटकर" मामांनी वातावरणाचा भंग केला. "अँबर जास्त लवकर द्यायला हवा."

"ठीक आहे." उत्तर आले, आणि पिवळा प्रकाश लगेच प्रखर झाला. आता मंच प्रकाशात पूर्णपणे उजळला होता. चित्रविचित्र सुंदर पोशाख घातलेले असंख्य लोक स्टेजवर आले. फेटे, कशिदाकाम केलेले अचकन, रंगीबेरंगी जाकिटे, सलवारी आणि लांब ढगळ कुडते. ..नजर ठरत नव्हती.

"किती छ. र कपडे .ाहेत." पारो पुटपुटली.

"त्या काळातले लो कसा वेष करीत ते समजून घेण्यासाठी आम्हाला जुनी चित्रं आणि वेषभूषेवरची किती पुस्तकं पालथी घालावी लागली." अनूने सांगितले. "ऐतिहासिक नाटक करताना अशा बारकाव्यांची फार काळजीपूर्वक आठवण ठेवावी लागते. सैनिक कशा प्रकारच्या ढाली तलवारी वापरत हे पाहायला आम्ही पुराणवस्तुसंग्रहालयातसुद्धा गेलो होतो. अफगाण राज्यकर्त्यांची शस्त्रे आणि वेष रजपूतांपेक्षा फार वेगळा असे. नाटकाने मुलांना पाहता पाहता मध्ययुगीन दिल्लीला नेऊन सोडले. शिपाई, राजकुमार, भिकारी, हेर, व्यापारी आणि राजे–कितीतरी भिन्न प्रकारची माणसे रंगमंचावर अवतरली होती. तुघलक राजाचे काम करणारा उंच देखणा नट किती रुबाबदार होता. त्याचा आवाज किती भरदार होता. राजमातेला जेव्हा बाजाराच्या चौकात ठार मारण्यासाठी शिपाई फरफटत घेऊन गेले तेव्हा पारो ओक्साबोक्शी रडली.

"हे सगळं खरंच घडलं का?" डीडोने विचारलं

"हो डीडो. ह्या सगळ्या खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक घडामोडी आहेत. अर्थात नाटककार त्यांना स्वतःच्या दृष्टिकोणामधूनच मांडतो. नाटककार गिरीश कर्नाडच्या मताप्रमाणे तुघलक फार मोठा माणूस होता. त्याच्या सगळ्या मित्रमंडळींनी, आईनेसुद्धा त्याला धोका दिला. म्हणून तो राजवटीच्या अखेरीस असा दुष्ट आणि क्रूर बनला."

"राजू आवाज फेक! स्पष्ट बोल. ओरडू नकोस." प्रेममामांची पुन्हा एकवार सूचना ऐकू आली.

स्टेजवरती एकाकी निराश राजा आपल्या जुन्या मित्राचा, इतिहासकार बाराणीचा निरोप घेत होता. बाराणीदेखील त्याला सोडून चालला होता. राजू बाराणीची भूमिका करीत होता.

"त्या ओळी पुन्हा घ्या." मामांनी फर्मावले.



नट पुन्हा तो प्रवेश करू लागले.

"प्रेक्षकांना जर ऐकूच गेलं नाही तर चांगला अभिनय करूनही काही उपयोग नाही." अनूने सांगितले. "नाट्यशिक्षणामधला हा सगळ्यात पहिला, आणि महत्त्वाचा पाठ."

नाटक अखेर संपले. शेवटच्या प्रवेशाचा दीपकच्या मनावर फारच परिणाम झाला. तिन्हीसांजा झाल्या होत्या, शहर अंधारात बुडू लागले होते. म्हातारा एकाकी राजा पायऱ्यांवर भकासपणे बसला होता. त्याच्यामागचे दिवे हळूहळू विझत गेले, सावल्या चहूबाजूंनी लांब लांब पसरू लागल्या आणि अखेरीस राजा काळोखामधे विलीन झाला.


"काटकर, हाउस लाइट्स." मामांची अंधारातून सूचना आली. प्रेक्षकगृहात प्रकाश आला.

"अनू, मी पुन्हा एकदा ध्वनी आणि प्रकाशाची तालीम करणार आहे. तू मुलांना बॅकस्टेज घेऊन जा. त्यांची नटांशी ओळख करून दे."

"ओहो!" दीपक आनंदाने म्हणाला "अनू, माझी तुघलकशी ओळख करून दे ना."

"मला तो स्वाक्षरी देईल?" डीडोने विचारले.

"नक्कीच देईल" अनूने आश्वासन दिले. "चला जाऊ या."



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. क. 2033 दिनांक 39/3/C8
विषय 611.दी. क. ........



स्टेज ओलांडून मुले रंगपटात गेली. निळी साडी नेसलेल्या एका हसतमुख बाईने त्यांचे स्वागत केले. हीच तुझी आतेभावंडं ना अनू?" तिने विचारले.

"फक्त दीपक माझा भाऊ आहे सतीताई" अनू उत्तरली." ही त्याची दोस्त-मंडळी. परवीण आणि रफीक."

"कोकाकोला पिणार?" त्या बाईने मुलांना विचारले. मुलांनी माना डोलावल्या. एवढ्यात पावलांचा आवाज झाला, आणि साक्षात महमद तुघलक मुलांसमोर उभा राहिला.

"ताई, मला चहा हवा आहे." आपला फेटा सोडत तो म्हणाला. आपले सोनेरी अचकन अंगातून काढताना त्याचे अनुकडे लक्ष गेले.

"अनू?"

"अहमदसाहेब, हा माझा आतेभाऊ दीपक. त्याला नाटकात काम करायची फार आवड आहे. हे त्याचे मित्र. परवीण आणि रफीक."

"मग काय, तुम्ही नट होणार तर?" त्याने मुलांशी शेकहँड केला आणि पारोची पाठ थोपटली.

"तुमच्याइतकं छान काम करता आलं तर" दीपक लाजत म्हणाला.

"माझ्यापेक्षा नक्कीच जास्त चांगलं." अहमदसाहेब हसत म्हणाले. मग त्यांनी तोंडावर कोल्ड क्रीम थापली, आणि कापसाने ते ती पुसून काढू लागले.

त्याच्या चेहऱ्यावरच्या सगळ्या रेघा आणि सुरकुत्या हां हां म्हणता नाहीशा होऊ लागल्या. त्याने मग दाढीला तेल लावले. पांढरी दाढी काळी झाली!



"आता दाढी उपटून काढणार का?" पारोने विचारले.

"नाही. दाढी माझी स्वतःची आहे." अहमदसाहेब म्हणाले. पण बाराणी मात्र लवकरच आपली दाढी काढून टाकील." एवढ्यात बाराणीचे काम केलेला राजू आत आला.

राजू दाढीचे झुपकेच्या झुपके काढू लागला. "आता परत कशी लावणार?" पारोला मोठा प्रश्न पडला.

आमचे मेकअपमॅन आहेत ना देसाई, ते मला नवी दाढी लावून देतील." राजूने समजावून सांगितले.

"तुम्ही का नाही दाढी वाढविली?" डीडोने सरळच सवाल केला.

"कारण दुसऱ्या नाटकात मी एका तरुण अवखळ मुलाचं काम करतो." राजू म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावरचा सगळा रंग नाहीसा झाल्यावर तो खरोखरच अगदी पोरगेला दिसू लागला. अनूपेक्षा जेमतेम थोडा मोठा.

"अय्या, मला वाटलं तुम्ही खरेखरेच म्हातारे आहात. पारोला हसू आवरेना "तुमचा आवाजसुद्धा कसा कापत होता"

"चला, तुम्हाला मी म्हातारा वाटलो हे छानच झालं." राजू म्हणाला. "असा कापरा आवाज काढायला फार त्रास पडतो हं! तशा आवाजात मोठ्याने बोलता येत नाही.


"हो. मामा 'आवाज' म्हणून मधे ओरडले होते, नाही का?" दीपक म्हणाला.

"हो. काय ग अनू, तुला माझा आवाज नीट ऐकू आला का?"

"तू दुसऱ्यांदा तो प्रवेश केलास तेव्हा आला."

"आपल्याला तरुणांची कामं करण्यापेक्षा म्हाताऱ्या माणसांची कामं करायलाच जास्त आवडतं." राजूने सांगितलं. "ती जास्त अवघड असतात. म्हणून काम करायला कसं आव्हान वाटतं."

दीपकने राजूचे विधान मनात नमूद केले. संधी मिळाली रे मिळाली, की तोही म्हाताऱ्याचे काम करणार.



"राजमाता कुठे आहे?" पारोला एकदम आठवण झाली. "मला भेटायचं आहे तिला."

"ती जरा थकली होती." अनूने माहिती दिली. "ती विश्रांतीसाठी म्हणून परत वसतिगृहात गेली असणार."

सतीताई लगबगीने आत आल्या. "मुलांनो, तुमचा कोकाकोला. राजू, मला सगळी प्रॉपर्टी दे. नाहीतर हरवून टाकशील काही तरी."

राजूने एक पुस्तक, पर्स आणि काठी ताईंच्या हवाली केली. "मग काय पोरांनो" दरवाजातून प्रेममामांनी विचारले "स्टेजच्या मागे काय काय चालतं ते पाहुला गंमत आली की नाही?"

"हो तर!" दीपक म्हणाला "मला सेट फारच आवडला. किती सुरेख होता!"

"आम्हाला मुंबईहून आमचा सेट नाही आणता आला." मामा म्हणाले.

"म्हणून मग नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाचा सेट आम्ही उसना घेतला. नुकताच त्यांनी या नाटकाचा प्रयोग केला होता."

"म्हणजे काय? ॲक्टर्ससाठी शाळा आहे?" डीडोने आश्चर्याने विचारलं.

"हो ना."

"काय मजा!" दीपकचा शेरा.



"राजूने नुकतीच बी. ए.ची परीक्षा दिली आहे. पुढच्या टर्मला शाळेत दाखल होता येईल अशी त्याला आशा आहे."

"अहमदसाहेब तुम्ही गेला होता त्या शाळेत?" दीपकने प्रश्न केला.

"छे रे बाबा. आमचं कुठलं एवढं भाग्य?" अहमदसाहेबांनी सुस्कारा सोडला. "आमच्या लहानपणी, नाटकाबिटकाच्या शाळा नसत. मी आपला हौशी नट आहे. मी एका कॉलेजात शिकवतो. रिकाम्या वेळात मी हिंदमंचच्या नाटकातून कामं करतो, किंवा आमच्या कॉलेजची नाटकं बसवतो. राजूची आणि तुमची पिढी नशीबवान खरी! तुम्ही तर व्यावसायिक नट होऊ शकाल."

"तुला शाळा पाहायला आवडेल का दीपक?" प्रेममामांनी विचारले. "उद्या सेट परत करायला आणि शाळेच्या डायरेक्टरचे आभार मानायला मला जायचंच आहे. राजू येणार आहे स्कूल बघायला."

"मला पण यायचं आहे" दीपक उत्साहाने ओरडला.

"ठीक आहे! आता मात्र आपल्याला घरी परतायला हवं." प्रेममामा म्हणाले "जेवण करून परत थिएटरवर ३ वाजता यायचं आहे आपल्याला. आज संध्याकाळी ६॥ वाजता प्रयोग आहे. विसरू नका हं!"

# नटांसाठी शाळा

'तुघलक' विलक्षण यशस्वी झाले. उत्तम टीमवर्क, आणि नाटकातले कुशल नट, यांचे कौतुक सर्वतोमुखी झाले. विशेषत: तुघलक, राजमाता आणि बाराणी यांच्या भूमिकांची वाहवा झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी डीडो आणि दीपक प्रेममामाबरोबर ट्रकमधून थिएटरवर गेले. तिथे त्यांना राजू आणि काटकर भेटले. सेट सगळा सोडून तयार होता, तो ट्रकवर चढवायला त्या दोघांनी मदत केली. मग सगळी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाला गेली. स्कूल एका मोठ्या प्रशस्त इमारतीत होते. भोवताली खूप मोकळी जागा होती. आत गेल्यागेल्याच एक तरतरीत देखणा तरुण पुढे आला.

"शाळेमधे सुस्वागतम्" तो राजूला म्हणाला.

"रमेश, अरे अजून कशाचा कशाला पत्ता नाही." राजू विनयाने म्हणाला.

"काल तुझं बाराणीचं काम पाहिलं. तुझी शाळेसाठी निवड होईल यात शंका नाही. छान काम केलंस. अभिनंदन !"

त्याचे आभार मानून राजूने बाकीच्यांशी ओळख करून दिली. "चला प्रथम वर्कशॉपमधे जाऊ. तिथेच सेट परत केले पाहिजेत." रमेशने सांगितले. एका मोठ्या खोलीत तो त्यांना घेऊन गेला. जोरजोरात आवाज करणाऱ्या विजेच्या करवतीने एक माणूस काम करीत होता. "या इथेच आमचे सेट तयार होतात" करवतीच्या आवाजावर आवाज चढवून राजूने माहिती दिली.

एका कोपऱ्यात काम करीत असलेल्या एका इसमाकडे डीडोचे लक्ष गेले. "तो काय करतो आहे?" रमेशला त्याने विचारले.

"तो राव. इथलाच एक विद्यार्थी आहे. आमच्या एका नाटकाचं तो लहानसं मॉडेल बनवतो आहे."

मॉडेल संपूर्णपणे हलक्या लाकडापासून बनवलं होतं. खुर्च्या, टेबलं, बिछाने, दरवाजे सारं काही मापाप्रमाणे केलेलं होतं. बाहुलीच्या घरातल्या एखाद्या खोलीसारखा तो चिमुकला सेट वाटत होता. तो पाहून डीडो फार खूष झाला.

"पारो आली असती तर बरं झालं असतं. तिला हे पाहायला फारच आवडलं असतं. असं मॉडेल बनवायला शिकायला मला फार आवडेल."

"मला वाटलं तुला नट व्हायचं आहे म्हणून" राजू म्हणाला.

"दीपकला नट व्हायचं आहे. मला माझ्या वडिलांसारखं आर्किटेक्ट बनायचं आहे," डीडोने समजावून सांगितले.

"फारच छान." प्रेममामा म्हणाले "आम्हाला नाटक आणि अभिनय यांचा समज असणारे आर्किटेक्ट हवेच आहेत चांगली थिएटर्स बांधायला."

"दीपकला वर्कशॉपमधे सुद्धा काम करावं लागेल हं. "रमेशने बजावलं" सेटचं डिझाइन बनवणं आणि तो बनवायला मदत करणं, हे सगळ्याच विद्यार्थ्यांना करावं लागतं. चला, आत जाऊन काही वर्ग पाहू या."

रमेश ज्या वर्गात मंडळींना प्रथम घेऊन गेला, त्या वर्गातली सगळी मुले खाली डोके स्नायूवर पाय करून उभी होती, योगाभ्यासाचा वर्ग चालू होता. योगाभ्यासामुळे वरचा ताण कसा कमी होतो, आणि शरीर लवचिक कसे बनते, ते रमेशने समजावून सांगितले. तसेच त्यामुळे दमही वाढण्यास मदत होते! शेजारच्या खोलीतून तबल्याचे बोल आणि घुंगरांची छुमछुम ऐकू येत होती. नाचाचा तास चालू होता.

"मुलं लोकनृत्य शिकताहेत." रमेश म्हणाला. "नृत्यामुळे नटाच्या हालचालींना

डौल येतो, आणि त्याला तालाचे महत्त्वपण समजते. आमच्या बऱ्याचशा नाटकांमधून विशेषतः लोकनाट्यांमधून नाच असतात.

पलिकडच्या खोलीत दोन विद्यार्थी एका गाण्याची तालीम करीत होते. "आमचे संगीताचे पण वर्ग आहेत. आवाज फेकायला संगीताची फार मदत होते. चला आता आमच्या छोटेखानी बंदिस्त थिएटरला भेट देऊ.

थिएटर छोटे, सुबक आणि अतिशय व्यवस्थित होते. तिथे अभिनयाचा वर्ग चालू होता, त्यामुळे सगळे अगदी गपचूप आत शिरले.

"विद्यार्थी मनाने प्रसंग जुळवताहेत. याला इम्प्रोव्हायझेशन म्हणतात" रमेश हलकेच कुजबुजला.

"पण म्हणजे काय?" डीडोला शंका आलीच.

"शिक्षकाने मुलांना एक गोष्ट सांगितली आहे. ती गोष्ट त्यांना वठवून दाखवावी लागते. जाता जाता ते प्रसंग, संवाद जुळवत जातात. हे आता चालू आहे त्याला म्हणतात 'माइम' म्हणजे मूकाभिनय, फक्त हावभाव आणि हातवारेच काय ते करायचे. बोलायचं मुळीच नाही" स्टेजवर दोन मुलगे आणि एक मुलगी होती. मुलांची आपसात लढाई चालली होती. मुलगी त्यांना दूर करायचा प्रयत्न करीत होती, हमसाहमशी रडत होती. एकदम एका मुलाने जोरात ठोसा मारला, तो त्याच्या प्रतिस्पर्ध्याला लागण्याऐवजी त्या मुलीलाच लागला. ती कोलमडून खाली पडली. मुलांची मारामारी थांबली. खाली वाकून ते मुलीला शुद्धीवर आणायचा प्रयत्न करू लागले. पण ती निपचित पडूनच राहिली. दोन्ही मुलगे रडू लागले. तिच्या देहाला साक्षी ठेवून त्यांचे भांडण त्यांनी संपवले. "ठीक आहे, इथेच थांबा," पहिल्या रांगेत बसलेली एक बाई म्हणाली. ती अभिनय शिकवीत असे.

"आता आपण या प्रवेशाबद्दल चर्चा करू. त्यात कशी कशी सुधारणा करता येईल?"

"चला, मी तुम्हाला आमच्या खुल्या रंगमंचाकडे घेऊन चलतो," तिथून बाहेर पडता पडता रमेश म्हणाला.

"तू मुलांना घेऊन जा रमेश." प्रेममामांनी सांगितले. "तोपर्यंत मी तुमच्या डायरेक्टरना भेटून येतो."

खुले नाट्यगृह पाहुणे मंडळींना फारच लोभस वाटले. "हे बांधायला विद्यार्थ्यांनी खूप मदत केली बरं का." रमेशने अभिमानाने सांगितले.

"इथे आणखी काय काय शिकता?" राजूने विचारले.

"नाच, योगाभ्यास, संगीत आणि अभिनय यांचे वर्ग तर तुम्ही पाहिलेच. याशिवाय नेपथ्यरचना, वेशभूषा, आणि भारतीय आणि पाश्चिमात्य नाटक आम्ही शिकतो. प्राचीन संस्कृत नाटके आणि आधुनिक भारतीय नाटकेदेखील आम्ही करतो."

"संस्कृतमध्ये नाटके?" दीपक चांगलाच घाबरला.

"छे रे. हिंदीमध्ये." रमेश हसून उत्तरला. "जी पाश्चिमात्य नाटके आम्ही करतो, त्या साऱ्यांचा हिंदीमध्ये अनुवाद केलेला असतो." मग राजूकडे वळून तो म्हणाला "मी निर्मिती हा विषय घेतला आहे खास शिक्षणासाठी. तू अभिनय घेणार का?"

"हो. मला प्रवेश मिळाला तर." राजू हसत म्हणाला.

"मला वाटलं की ही शाळा अभिनयासाठीच आहे." डीडोने आपले मत प्रकट केले.

"नाही. या शाळेत नाट्यकलेच्या साऱ्याच अंगांचे शिक्षण दिले जाते. तुम्ही नट, निर्माता किंवा तंत्रज्ञ होऊ शकता."

"मला तर नट व्हायचं आहे" दीपक म्हणाला. "प्रेममामांनी जाण्याआधी आम्हाला आमच्या नाटकात मदत करायचं कबूल केलं आहे."

"कधी आहे ते मला कळवा." रमेश म्हणाला "मी नक्की येईन पाहायला."

"अगदी अवश्य. वचन!" दीपकने कबूल केले. एवढ्यात प्रेममामा येऊन पोचले.

# तयारी !

अनू बागेमध्ये बसून पुस्तक वाचीत होती. एकीकडे ती आपले लांबसडक कुरळे केस वाळवीत होती. तिचे काम असलेले हिंदमंचचे दुसरे नाटक आदल्या दिवशीच झाले होते. साहजिकच थोडे थकल्यासारखे वाटत होते. प्रयोग छान झाला होता. आजकालच्या तरुणतरुणींची समस्या नाटकात हाताळली होती. प्रेक्षक खूप होते.

टप्पो पोटावर पालथा झोपून हवेत तंगड्या हलवीत होता. हाताने पुस्तकातले चित्र रंगवण्याचे काम चालले होते.

एकदम दीपक आणि डीडो फाटकातून धावत आत आले.

"अनूताई" धापा टाकीत दीपक म्हणाला," प्रेममामा म्हणतात की आम्ही करण्याजोगतं एक नाटक त्यांना मिळालं आहे आणि ते आम्हाला मदत करणार आहेत आणि मी काही मित्रांना पण त्यात काम करायला विचारलं आहे तर तू नाटक बसवशील का कारण प्रेममामा म्हणाले आमच्यापेक्षा तुला जास्त कळतं आणि सगळं काही लहान मंडळींनीच केलं पाहिजे...."

"आधी गप्प हो पाहू दीपक" अनू काकुळतीला आली. माझ्या कानाचा पडदा फाटून जाईल बघ. आणि बोलताना असा गडबडगुंडा करशील ना तर कधी जन्मात नाटक जमणार नाही बघ तुला." अनूने लटका दम भरला.

"पण अनूताई करशील ना. वचन दे."

"अरे पण कसलं वचन देऊ?"

"आमचं नाटक बसवून द्यायचं"

"कुठलं नाटक?"

"आताच नाही का सांगितलं?" दीपक हताश होऊन म्हणाला.

"दीपक मला सांगू दे" डीडोने मध्येच तोंड घातलं. "तू अगदी पुरता चेकाळला आहेस. तुला धड सांगताही येत नाही आहे. सांगू का, दीपकला अमरसिंग राठोडवर नाटक करायचं होतं. पण ते काही मिळालं नाही, म्हणून प्रेममामांनी आमच्यासाठी दुसरंच नाटक शोधून काढलं. पंचतंत्रामधल्या गोष्टीवर आधारलेलं आहे ते. 'कृतघ्न माणूस'!"

"हो, हो. मला ठाऊक आहे ते नाटक" अनू म्हणाली. "मला फारच आवडेल हं ते बसवायला."

"मीऽऽ पऽन" टप्पो मध्येच ओरडला, आणि आपली खडूची पेटी त्याने पार फेकून दिली.

"हो बाबा तू पण" अनूने कबूल केले. "पण दीपक, पुरेशी पात्रं मिळतील का? दसऱ्यासाठी शाळा बंद आहे म्हणून तुझे बहुतेक मित्र बाहेरगावी गेले आहेत ना?

"बरीच जणं इथेच आहेत. मी आणि डीडो आज सकाळभर सगळ्यांकडे जाऊन विचारण्याचाच उद्योग करीत होतो. सगळ्यांना मी संध्याकाळी 4 वाजता बोलावलं आहे. हिंदमंचचे बाकीचे लोक जरी आज परत जाणार असले, तरी तू आणि प्रेममामा उरलेली सुट्टी संपेपर्यंत थांबणार आहात, असं त्यांनीच मला सांगितलं. म्हणजे नाटक बसवायला आपल्याला तब्बल 15 दिवस मिळतात."

"खूप मोठं नाटक आहे" अनू म्हणाली "कदाचित आपल्याला कापावं लागेल. पण हे पहा पपा आले."

प्रेममामा नाटकाची प्रत घेऊनच आले होते. सगळ्यात आधी काय उद्योग सगळ्यांनी केला, तर वेगवेगळी कामं उतरवून काढली. अनू आणि प्रेममामांनी बसून नाटकात बरीच काटछाट केली. वेळ फार थोडा होता. तेवढ्याच मुलांना पाठ करायला कमी ओळी.

"आपण कुठे नाटक करायचं?" अनूने विचारले.

"बाहेर बागेत करता येईल. मी मिस्टर अन्वरांना विचारलं आहे. त्यांच्या एका मित्राच्या घरासमोर खूप मोठी बाग आहे. इथून जवळच आहे."

"हां हां, कपूरकाका असणार नक्की." डीडोने तर्क लढवला. "त्यांची बाग खूप मोठी आहे अनू, आणि हिरवळीपर्यंत येणारा एक उघडा सज्जा आहे तिथे. प्रेक्षक हिरवळीवर बसतील, आपण सज्जात नाटक करू."

"फार उंच नाही ना सज्जा?" अनूची शंका.

"छे छे. हिरवळीच्या वर दोन पायऱ्या फार तर."

"झक्क! पण पपा प्रकाशयोजनेचं काय?"

"चार पाच स्पॉट्स पुरतील. प्रयोग संध्याकाळी जरा लवकरच करणार आहोत. थिएटरमधल्या एका मित्राकडून मी दिवे भाड्याने मिळवीन." मामांनी सांगितले. "दीपक, मला तुझा मंचव्यवस्थापक नेम, डीडो माझा मदतनीस होईल."

"चालेल चालेल." मुले उत्तरली.

"मला वाटतं पपा, प्रत्येक विभागाचे मुख्य मोठ्या माणसांना करावं. मुलं त्यांच्या हाताखाली काम करतील." अनूने आपले मत सांगितले. "डीडो, तुझी आई करील मदत?"

"आताच मी पारोला तिला विचारायला पाठवलं, ती पोशाखाची जबाबदारी घेईल का ते. बेतणं आणि शिवणं तर तिच्या हातचा मळ आहे अगदी. फार छान कपडे शिवते ती. फॅन्सी ड्रेस स्पर्धेमधे पारोला आणि मला नेहमीच बक्षिसं मिळतात. आणि आम्ही कधीच आमचा पोशाख विकत आणीत नाही. अम्मा स्वतःच कपड्याचं डिझाइन पण बनवते आणि शिवतेपण. पारो तिला मदत करते अगदी मनापासून."

"मी ऽऽ प ऽ न." टप्पो ओरडला.

"सगळा गोंधळ घालून ठेवायला टप्पो मदत करतो." डीडो म्हणाला. यावर सगळे मनापासून हसले.

"बरोबर 4 वाजता दीपकच्या घरी मुलंमुली जमायला सुरुवात झाली. 4–15 वाजेपर्यंत इतकी काही गर्दी जमली, की हिरवळीवर सतरंजी घालायचे अनूने ठरविले.

"तुम्हाला प्रथम सांगायचं म्हणजे"—अनूने सुरुवात केली. अगदी बरोबर दिग्दर्शकाचा आव तिने आणला होता. "प्रत्येक तालमीला वेळेवर आलं पाहिजे. नाटक बसवायला फार थोडा वेळ आहे. एकेक मिनिट मोलाचं आहे. तालीम जर 4 वाजता असेल तर 4 ला 10 मिनिटं असताना हजर व्हा. 4 वाजून 10 मिनिटांनी नव्हे."

उशिरा आलेली मुले ओशाळून एकमेकांकडे पाहू लागली. "आणि मिळालेल्या कामाबद्दल कुरकूर करायची नाही." अनू बोलतच होती. "प्रत्येक भूमिका सारखीच महत्त्वाची असते. अर्थात काही कामे मोठी असतात हे खरं. पण कमी काम असलेल्या मुलांना तेवढंच पाठ करायला कमी."

मुले हसू लागली.

"तिसरी गोष्ट म्हणजे शक्य तितक्या लवकर आपापलं काम पाठ करणं. आजकाल गृहपाठ नाही तुम्हाला. वेळही खूप आहे. तुमच्या ओळी म्हणून घ्यायला आणि तुम्हाला 'क्यू' द्यायला कुणीतरी गाठा."

"'क्यू' म्हणजे काय? एका गुटगुटीत मुलाने गोळी चोखत प्रश्न केला.

"क्यू म्हणजे आपल्या ओळीच्या आधी येणाऱ्या संवादाची शेवटची ओळ. ही पण आपल्याला ठाऊक पाहिजे. नाहीतर नेमकं केव्हा बोलायचं तेच कळायचं नाही. गंमत म्हणजे पाहता पाहता तुम्हाला मुळी सगळ्यांचेच संवाद पाठ होतील. हसा पाहू, एवढं खट्टू नको आहे व्हायला."

थोडीशी चाचणी घेऊन अनूने कामे वाटून दिली.

दीपक कृतघ्न माणूस बनणार होता. डीडो ब्राह्मण. पारोला राजकन्येचे काम देताच ती लाजून आढेवेढे घेऊ लागली. पण डीडो ठणकावून म्हणाला "नाटकात काम करायचं म्हणून नाचत होतीस ना? आता भाव खाऊ नको."

टण्णोला माकडाचे लहानसे काम कबूल करण्यात आले. अर्थात बाकीच्या

सगळ्यांची कामं करायला तो स्टेजवर धावत जाई. त्याला आवरणे फारच कठीण होते.

तालमी दीपकच्या घरी ठरल्या. दिवाणखाना जरी छोटाच असला, तरी त्याच्या आईने जवळजवळ सारे सामान बाहेर हलवले होते. तेव्हा निम्मी जागा मोकळीच होती. तिचा स्टेज म्हणून वापर करता येणं शक्य होतं.

दुसऱ्याच तालमीला अन्वरकाकू काही सुटे कागद घेऊन आल्या. त्यांनी ते अनूला दाखविले.

"पपा पपा" अनू आनंदाने उद्‌गारली "येऊन पहा तर खरं. अन्वरकाकू तुम्ही खऱ्या चित्रकार आहात हं! अगदी मस्त डिझाइनर. काय सुरेख पोशाखांची चित्रं बनवली आहेत तुम्ही."

सगळ्यांना—अर्थात त्यांची स्वतःची मुले सोडून—आश्चर्याचा गोड धक्का बसला. प्रत्येक पात्राचं वेगवेगळ्या कागदावर चित्र काढलेलं होतं, नाटकातल्या त्याच्या पोशाखासकट. कपडे रंगवलेले होते. कागदाच्या कोपऱ्यात कापडाचे लहानगे तुकडे टाचले होते. या कापडाप्रमाणे पात्राचा पोशाख आणि पोशाखाचा रंग असणार.


"तुम्ही नाटकाची वेषभूषा करण्याचा व्यवसायच करा." प्रेममामा म्हणाले. मुलांना पाहता यावी म्हणून सगळी चित्रं त्यांनी टेबलावर मांडली. "माझ्या पुढच्या नाटकाची वेषभूषा तुम्हीच बनवा."

"थट्टा करता काय?" अन्वरकाकू स्मित करीत म्हणाल्या, "अनू, तू मुलांची मापं घे पाहू. उद्या कापड आणून मला बेतलं पाहिजे."

"पुरेसे मदतनीस आहेत का पण?" अनूने प्रश्न केला.

"आहेत की. दीपकची आई आहे. एक दोन मोठ्या मुली सकाळी मदतीस येतील, सगळ्यांच्यात मिळून दोन शिवण्याची मशीन्स आहेत आमच्याकडे."

दीपकच्या शाळेतल्या गायनाच्या बाई एक दिवशी तालमीला आल्या. त्यांना




इतकी गंमत वाटली की संगीताची जबाबदारी उचलण्याचे त्यांनी कबूल केले. पात्रांपैकी काहीजण इतके लाजाळू होते की तीन दिवसांतच त्याना बदलायला लागले.

दोन्ही घरांना अगदी लग्नघराची कळा प्राप्त झाली होती. सगळीकडे आनंदीआनंद होता. नाटक बसवण्यात आपला सगळाच वेळ आणि बरीचशी शक्ती खर्ची पडते असे दीपकच्या लक्षात आले. पण गंमत किती येते! इतकी कामं होती की कंटाळा यायला किंवा रुसाफुगी करायला मुळी वावच नव्हता. अर्थात किरकोळ तक्रारी होत्याच. उदाहरणार्थ वाक्यं विसरल्याबद्दल अनूची बोलणी; किंवा घट्ट झालेला कुडता. पण हे चालायचंच. कुडत्यावरून पारो खूपच कुरकुरली. कारण तो उसवण्याचे काम आईने तिच्यावर सोपवले. पण या झाल्या क्षुल्लक बाबी. आयुष्यात एवढी मजा यापूर्वी कधी आली नव्हती.





# सोन्याचा दिवस

नाटकाच्या दिवशी सकाळी, डीडो आणि दीपक प्रेममामांबरोबर कपूरांच्या बंगल्यावर गेले. सज्जा फार शोभिवंत दिसत होता. छोट्या छोट्या कुंड्या ओळीने मांडल्या होत्या. खाली पाचोळा पडला होता.

"प्रथम स्टेजची जागा साफ करून घेतली पाहिजे आणि समोरच्या कुंड्या हटवल्या पाहिजेत. नाहीतर प्रेक्षकांना काही दिसणार नाही."

"माळी कुठे आहे?" दीपकला प्रश्न पडला.

"कशाला हवा आहे?"

"सज्जा झाडायला."

"सज्जा आपण झाडू शकतो." प्रेममामा म्हणाले. कोपऱ्यात पडलेला एक छोटा बागेचा झाडू त्यांनी उचलला. "थिएटरमधे, एकादं काम दुसऱ्याने करण्याची वाट पाह्यची नाही. आपणच ते करून टाकायचं. बरं का दीपक!"

"मी करणार नाही, असं मला नव्हत म्हणायचं" दीपक वरमून म्हणाला.

"तू आणि डीडो कुंड्या उचला. त्या सुबक रीतीने मागच्या बाजूला मांडून ठेवा. मधलं प्रवेशद्वार मोकळं ठेवा मात्र."

मुलांनी आणि प्रेममामांनी लवकरच सज्जा साफ केला. अनू आणि दीपकची आई सेट आणि सामान घेऊन आल्या. पाठोपाठच प्रेममामाचा मित्र टेपरेकॉर्डर आणि स्पॉटलाइट्स घेऊन उगवला. त्याला दिवे मांडायला डीडोने मदत केली.

सगळी तयारी झाल्यावर मंडळी घरी जेवायला आणि विश्रांतीला गेली. अन्वरकाकू

आणि पारो पोषाकांना इस्त्री करण्यात आणि मेकअपचे सामान जमवण्यात गर्क होत्या. 4 वाजता नाटकातील मुले कपूरांकडे जमणार होती. नाटक 6 वाजता सुरू व्हायचे होते.

"अनू, माझा आणि डीडोचा तो प्रवेश परत एकदा घे ना. तो ग, जिथे मी नेहमी वाक्य विसरतो."

"दीपक आता मुळीच काळजी करू नकोस. जरा डोकं शांत ठेवायला शीक." अनूने धीर दिला. "तुझं काम अगदी छान होतं आहे. आता मुळीच दगदग करू नकोस."

"प्लीज........" दीपक काकुळतीलाच आला.

"बरं तर. पण एकदाच हं." छोटी दिग्दर्शिका हसून म्हणाली. "चल रे डीडो."

त्यांनी पुरा प्रवेश केला. दीपकला आणखी एकदा तो करायचा होता पण आता मात्र अनूने त्याचे काही चालू दिले नाही. निष्कारण थकून जाण्यात काही अर्थ नव्हता.

दीपकने एका खुर्चीत अंग झोकून दिले. त्याची सगळी वाक्ये त्याच्या डोक्यात भणभणत होती. त्याचा गोंधळ उडून गेला होता. स्टेजवर एकदा गेल्यावर नक्की तो सगळं विसरणार! सगळ्याच नटांना असंच होतं का?

डीडो मॅकनोचे तुकडे जोडीत होता. "डीडो." दीपकने त्याला हाक मारली.

"तुला तुझी वाक्यं आठवतात? माझा भलता गोंधळ उडला आहे."

"वाक्यं न आठवायला काय झालं?" डीडोने शांतपणे उत्तर दिलं.

"एक लाख वेळा तरी घोकली असतील. धडाधड उलटीसुद्धा म्हणून दाखवीन मी. दाखवू?"

"नको नको" दीपक गडबडीने म्हणाला. "माझा आणिकच घोटाळा होईल."

अखेरीस 5 वाजले. कपूरांच्या बागेत जाण्यासाठी सगळे तयार झाले. मञ्ज्या-

जवळच्या एका खोलीत अन्वरकाकू आणि अनूने मिळून मुलांना पोशाख चढवले. चेहऱ्यांना हलका रंग लावला. 6 ला 20 मिनिटे होती.

दीपक तयार होऊन बसला होता. त्याने एकदम विचारले, "डीडो कुठे आहे ?"

"म्हणजे, इथे नाही आहे तो ! तो टोप आणायला गेला होता" प्रेममामांनी सांगितले. सगळ्यांचे हातपाय गळाले. रफिकशिवाय कशी सुरुवात करणार ? पारोला तर रडू कोसळण्याच्या बेताला आले.

"पारो, रडायचं नाही हं. सगळा मेकप खराब होईल" अनूने दटावले. मनातून तिचीही चांगलीच घाबरगुंडी उडाली होती.

तेवढ्यात दीपक ओरडला, "तो पहा आला. एक टांगा आत आला." रफीकच टांगेवाल्याशेजारी बसून घोडा हाकीत होता. त्याने खाली उडी ठोकली. "माझी सायकलच पंक्चर झाली. मला टॅक्सी मिळेना. तेवढ्यात नशिबानं एक टांगा दिसला. काय मस्त घोडा होता. दौडत आला नुसता."





"घोडा मरू दे" अनू रागावली. "जा लवकर जाऊन कपडे कर. नशीब, तुला फारसा मेकप नाही आहे ते."

दीपकने सुटकेचा श्वास सोडला. सहाला 10 मिनिटे उरली होती. आता त्याला मुळीच घाबरल्यासारखे वाटत नव्हते. चित्त पूर्णपणे शांत झाले होते.

"आपापल्या जागेवर सर्वजण." प्रेममामांनी हळू आवाजात इशारा दिला. बाग आता पालकांनी आणि मित्रमंडळींनी भरून गेली होती. "मी दोन घंटा देईन. पहिली 6 ला 4 मिनिटं असताना, प्रेक्षकांना सूचना द्यायला. दुसरी ठीक 6 वाजता. नाटक सुरू करायला. बेस्ट लक!"

"थँक्यू" मुले एका आवाजात म्हणाली.

दुसरी घंटा झाली. अखेर घटिका येऊन ठेपली होती. नाटक सुरू झाले.

एका गरीब सदाचरणी ब्राह्मणाची ती गोष्ट होती. त्याची बायको गरिबीला वैतागून त्याला एकसारखी घालूनपाडून बोले. अखेरीस दैवाचा शोध घ्यायला म्हणून तो घराबाहेर पडतो. वाटेत घनदाट अरण्य लागते. त्याला संकटात सापडलेल्या व्यक्तींचे आवाज ऐकू येतात. आवाजाच्या दिशेने तो जाऊन पाहतो, तो एका विहिरीमध्ये एक माणूस, एक माकड, एक वाघ आणि एक साप! ब्राह्मण ताबडतोब माकडाला, वाघाला आणि सापाला बाहेर ओढून काढतो. त्याचे आभार मानून ते त्याला बजावतात "काय वाटेल ते झालं तरी त्या माणसाला सोडवू नकोस. फार दुष्ट आहे तो." पण दयाळु ब्राह्मणाला त्याची कीव येते आणि तो त्यालाही बाहेर काढतो. आपण काशीचे सोनार असल्याचे तो माणूस ब्राह्मणाला सांगतो आणि त्याच्या दयाळुपणाबद्दल काही मोबदला देण्याचे कबूल करतो.

पुढे ब्राह्मण संकटात सापडल्यावर माकड त्याच्या मदतीला धावून जाते. दुसऱ्या खेपेला एका मेलेल्या माणसाच्या अंगावर सापडलेला सोन्याचा हार वाघ त्याला देतो.

हार घेऊन ब्राह्मण काशीला सोनाराकडे जातो. त्याला तो देऊन चांगल्या किंमतीला तो विकायला सांगतो. वाघाने ब्राह्मणाला हार दिला आहे यावर त्या कृतघ्न




सोनाराचा विश्वास बसत नाही. जंगलात ठार झालेल्या राजपुत्राचा तो हार तो ओळखतो आणि राजाकडे त्याप्रमाणे वर्दी देतो. राजपुत्राच्या खुनाबद्दल ब्राह्मणाची तुरुंगात रवानगी होते.

मग साप येतो. राजकन्येला डंख करून बेशुद्ध पाडण्याचा त्याचा डाव तो ब्राह्मणाला सांगतो. तिला शुद्धीवर आणणे कुणालाही जमणे शक्य नसते. त्यासाठी एकच मंत्र असतो, तो साप ब्राह्मणाला सांगतो.

सापाच्या संकल्पाप्रमाणेच सगळे काही घडते. राजकन्येला डंख करताच तिला अतिशय गाढ निद्रा येते. कुणालाच तिला जागं करता येत नाही. शेवटी ब्राह्मण पुढे होतो आणि राजकन्येला जागे करतो. ती डोळे उघडून उठून बसते. कृतघ्न सोनाराने आपल्यावर खुनाचा खोटा आळ कसा घेतला होता, ते ब्राह्मण राजाला सांगतो. माकड, वाघ आणि साप, तिघे दरबारात येऊन साक्ष देतात.





सोनारावर राजा अत्यंत संतापतो. त्याला तो फाशी द्यायला निघतो, पण दयाळु ब्राह्मण मध्ये पडतो. शेवटी सोनाराला हद्दपार करण्यात येते. ब्राह्मणाला तऱ्हेतऱ्हेचे नजराणे मिळतात आणि तो माकड, वाघ आणि साप या दोस्तांसमवेत परत बायकोकडे जातो.

दिवे मालवून सगळीकडे अंधार होताच टाळ्यांचा कडकडाट झाला. सगळी पात्रे दिग्दर्शिकेच्या पाठोपाठ ओळीने येऊन सज्ज्याच्या पुढे उभी राहिली. दीपक मध्य-भागी होता. दिवे आले तेव्हा पुन्हा टाळ्यांचा वर्षाव झाला. मुलांनी प्रेक्षकांना अभिवादन केले.

"मीऽऽपऽऽन" आवाज आला, आणि टाळ्या वाजवीत टप्पो पुढे धावला.

सगळे हसले. नाटक संपले होते. प्रेक्षक आणि नट आपसात मिसळले. गप्पा-गोष्टींना ऊत आला.

"चला, सगळ्यांसाठीच कोकाकोला आणि बिस्किटं आहेत" सौ. कपूर एक खच्चून भरलेला ट्रे घेऊन सामोऱ्या आल्या.



"ओहो मजा !" त्यांच्याभोवती घोळका करीत मुले म्हणाली.

त्या रात्री जेवताना दीपक, त्याची आई, अनू आणि प्रेममामा यांच्यात महत्त्वाच्या विषयावर गप्पा झाल्या. टप्पो केव्हाच गाढ झोपून गेला होता. दुसऱ्या दिवशी प्रेममामा आणि अनू मुंबईला जणार होते.

"मामा, खरंच मी नट व्हावं का ?" दीपकने विचारलं.

"अजून तू लहान आहेस हे ठरवायला. मात्र अभिनय तुला जमतो छान यात वादच नाही. शाळा पुरी व्हायच्या आत कदाचित तुझा बेत बदलेल. किंवा कदाचित पुढे कॉलेजात बदलेल."

"पण हा मार्ग निवडणं शहाणपणाचं ठरेल ?" दासमावशीनी विचारले.

"का नाही ? आता नटांसाठी नाना तऱ्हेच्या संधी असणार आहेत. रेडिओ, टेलिव्हिजन आहेतच. शिवाय आता शहरोशहरी व्यावसायिक नाट्यसंघ जोरात काम सुरू करतील."

"दीपक, या पहिल्या अनुभवावरून तू काय शिकलास ?" अनूने विचारले.



"एक म्हणजे मला वाटलं होतं त्यापेक्षा काम करणं हे खूपच अवघड आहे हे कळून चुकलं. खूपच मेहनत करावी लागते. स्कूल ऑफ ड्रामामध्ये देशोदेशींची नाटकं शिकतात. संगीत, नृत्य, योगाभ्यास, कॉस्टयूम डिझाइन आणि नेपथ्य — नटाला सगळं काही शिकावं लागतं."

'हो हे असं शिक्षण सगळ्यांत उत्तम!" प्रेममामा म्हणाले. "कारण मग प्रत्येकाला दुसऱ्याच्या अडचणींची कल्पना येते. नाटककंपनी ही एक...."

"टीम असते!" अनू आणि दीपकने वाक्य पुरे केले.

"हे तर खरंच." मामा हसून म्हणाले. "सगळ्यांनी एकत्र, आणि अतिशय निष्ठेने काम केले पाहिजे. तरच आपल्या देशात नाटक ही एक चळवळ बनू शकेल."

"उशीर होतोय हं." दीपकच्या आईने आठवण करून दिली. "उद्या सगळ्यांना लवकर उठून स्टेशनावर जायचं आहे. दीपक, समोरचे दिवे मालवून ये."

दीपक आज्ञाधारकपणे उठला. दुःखी चेहरा करून तो म्हणाला, "पुन्हा शाळेची शिस्त सुरू."

"सगळ्याच चांगल्या गोष्टींना अंत असतो." प्रेममामा म्हणाले. "सुटीला पण. पण चला, भारताच्या एका उगवत्या ताऱ्याला सुयश चिंतितो. बरं का दीपक दास!"

आणि ही शुभेच्छा खरी होण्याची स्वप्नं पहातच मंडळी झोपायला गेली.

म. सं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. २०33 दिनांक 31/3/08

Printed by Bharat Mudra[redacted]-110032

BVBK-0402933